# इयत्ता सहावी

# कृती संशोधन प्रकल्प विषय (2018–19)

## परिसर विकासासाठी परिसर सेना

**प्रस्तावना :**

सन 1997 मध्ये मुंबई महानगरपालिकेने 'प्रगत परिसर व्यवस्थापन' (Advance Locality Management) या उपक्रमाची सुरुवात केली. घनकचरा व्यवस्थापन व परिसर विकासामध्ये नागरिकांचा सहभाग मिळविणे, हा या उपक्रमाचा हेतू होता. अशाच उपक्रमाद्वारे विद्यार्थी एखाद्या परिसराच्या विकासासाठी त्या परिसरातील लोकांचा गट बनवून तेथील लोकांचे राहणीमान व तो परिसर सुधारू शकतात. अशा गटांना आपण 'परिसर सेना' असे संबोधू शकतो.

**'परिसर सेना' म्हणजे काय?**

एखाद्या परिसरातील लोकांचा एखाद्या विशिष्ट उद्देशाने तयार झालेला गट म्हणजे 'परिसर सेना'.

**'परिसर सेने'ची गरज :**

महानगरपालिका आणि ग्रामपंचायत यांसारख्या शासकीय यंत्रणेमार्फत प्रत्येक परिसराला सुविधा पुरविल्या जात असल्या, तरी स्थानिक लोकांना त्या नेहमीच अपुऱ्या वाटतात. परिसर विकास टिकून राहण्यासाठी व शासकीय यंत्रणा यशस्वीपणे कार्यरत राहण्यासाठी लोकांचा सहभाग व सहकार्य अनिवार्य आहे, असे आढळून आले आहे. 'परिसर सेने'द्वारे हे शक्य होऊ शकते व परिसर विकासाला हातभार लागू शकतो.

**'परिसर सेना' कोठे कार्यरत होऊ शकते?**

- घराभोवतालचा परिसर • बाजारपेठ
- मंडई • शाळेचा परिसर
- जन्मगाव/ आजोळ
- मनोरंजनाच्या जागा
- क्रीडांगण • बागबगीचे
- रोजच्या वापरातील इतर परिसर

**'परिसर सेने'ची उद्दिष्टे :**

- परिसरातील रहिवाशांना विचारांची देवाण–घेवाण करण्यासाठी व्यासपीठ पुरविणे
- परिसर विकासासाठी सुविधांचे चांगले व्यवस्थापन करणे
- परिसर स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनविणे
- शासन यंत्रणा व स्थानिक रहिवासी यांच्यामध्ये समन्वय साधणे

**'परिसर सेने'चे कार्य :**

- स्वच्छता राखणे • प्रदूषण नियंत्रण करणे
- पशुपक्ष्यांची काळजी घेणे • परिसर हिरवागार ठेवणे
- घनकचरा व्यवस्थापन करणे
- वाहतूक नियंत्रणात मदत करणे
- सामायिक वाहने वापरणे (car pooling)
- समाजोन्नती करणे • सुशोभीकरण करणे
- संसाधन व्यवस्थापन करणे
- शाश्वत जीवनशैलीचा प्रचार करणे
- जनजागृतीचे आयोजन करणे
- मदत गट तयार करणे • आपत्ती व्यवस्थापन करणे
- माहितीपत्रके, माहिती कोश (data bank) तयार करणे
- दक्षता पथके/ भरारी पथके तयार करणे इत्यादी.

**'परिसर सेने'ची स्थापना कशी करावी?**

'परिसर सेना' स्थापनेसाठी परिसरातील रहिवाशांनी एकत्र येऊन एक प्राथमिक सभा घ्यावी. परिसरातील समस्यांचे प्रभावीपणे व्यवस्थापन करावे, या मुख्य विषयावर चर्चा करावी.

**'परिसर सेने'च्या स्थापनेतील टप्पे :**

1. **'परिसर सेना' सदस्यांची निवड** : प्रत्येक विभागातील एका सदस्याची निवड करावी. उदा.

- शालेय सेनेसाठी प्रत्येक तुकडीतील एक विद्यार्थी
- बहुशालेय सेनेसाठी प्रत्येक शाळेतील एक सदस्य
- निवासी सेनेसाठी प्रत्येक निवासातील/गृहसंकुलातील एक सदस्य

2. परिसर सेनेचे सुयोग्य नामकरण करावे.

3. सदस्यांची पदरचना करून त्यांच्याकडे विविध जबाबदाऱ्या सोपवाव्यात. उदा. सल्लागार, तज्ज्ञ, अध्यक्ष, कार्यवाह, कोषाध्यक्ष, साधारण सदस्य आदी.

4. 'परिसर सेने'च्या स्थापनेची माहिती संबंधित शासकीय अधिकारी व इतर संबंधितांना द्यावी. 'परिसर सेना' स्थापनेचा उद्देश व संबंधितांकडून कोणत्या सहकार्याची अपेक्षा आहे, याची त्यांच्याशी चर्चा करावी. उदा. – निवासी परिसर सेनेच्या परिसरातील दुकान मालक, विभागीय शासकीय अधिकारी, पोलिस चौकी यांना माहिती द्यावी.

शालेय परिसर सेना शाळेतील इतर विद्यार्थी, शिक्षक, पालक, वरिष्ठ अधिकारी यांना माहिती देतील.

5. परिसरातील समस्या व त्यावरील उपायांची चर्चा करावी.

6. उपाययोजनांच्या कार्यपद्धतीवर व कार्यवाहीवर चर्चा करावी.

7. केलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा व सुधारित आराखडा तयार करावा.

8. 'परिसर सेने'च्या कार्याची नोंद नोंदवहीत करावी.

**पुढील कार्यवाही** :

वेळेनुसार/वेळोवेळी बदलणाऱ्या परिसराच्या गरजा, समस्या, उद्दिष्टे आणि उपाययोजना यांची दखल घ्यावी, नोंद ठेवावी व उचित कार्यवाही करावी.

**'परिसर सेना' सदस्यांच्या अत्यावश्यक जबाबदाऱ्या** :

- सेना सभेमध्ये उपस्थित राहून परिसरातील समस्या व त्यावरील उपाययोजना यावर चर्चा करणे.
- समस्या निराकरणासाठी जनजागृती करणे.
- माहितीपत्रके/ माहिती कोश/ मदत गट तयार करणे.
- समस्या, तक्रारी, सूचना, टीका स्वीकारण्यासाठी व्यासपीठ निर्मिती करणे.

**'परिसर सेने'चे पैलू** :

परिसर विकास साधण्यासाठी खालील पैलूंचा विचार करावा :

- परिसर स्वच्छ व हरित ठेवणे.
- परिसरातील रहिवासी, वनस्पती, प्राणी यांच्या आरोग्याची जपणूक.
- परिसरातील लहान मुले, वयोवृद्ध, महिला यांच्या गरजा भागविणे.
- समाजाची सुरक्षितता.
- अर्थव्यवस्था व रोजगारक्षमता.
- भौगोलिक परिस्थितीनुसार संवेदनशील विभाग, त्यातील समस्या व उपाययोजना. उदा. वाहतूककोंडी होणारी ठिकाणे, पूरक्षेत्र, पाण्याचे दुर्भिक्ष्य यांचा अभ्यास व उपाय.
- प्रमुख उद्दिष्टे निश्चित करून ती यशस्वी होण्यासाठी उपाययोजना करणे.

**'परिसर सेने'चे फायदे** :

- जनता व शासकीय अधिकारी यांच्यामध्ये समन्वय साधणे.
- प्रभावी घनकचरा व्यवस्थापन, शून्य कचरानिर्मिती व परिसर स्वच्छता.
- सांडपाणी व्यवस्थापन.
- परिसर विकासासाठी सदस्यांना प्रोत्साहन देणे.

'परिसर सेने'च्या उद्देशांनुसार परिणामी फायदे बदलले, तरी 'परिसर सेने'चे सर्वसाधारणपणे वरील फायदे असू शकतात.

**'परिसर सेने'चे संभाव्य सहयोगी** :

- पोलिस • अग्निशमन दल
- परिसरातील संस्था • वाहतूक नियंत्रण अधिकारी
- सभोवतालच्या इतर परिसर सेना (मार्गदर्शनासाठी व सहयोगासाठी)
- परिसरातील प्रतिष्ठित व्यक्ती. उदा. कलाकार, पत्रकार, लेखक, पक्ष कार्यकर्ते आदी.

**विद्यार्थ्यांनी काय करायचे आहे?**

- पत्रिका काळजीपूर्वक वाचून आशय समजून घ्या.
- परिसराची निवड करा. उदा. निवासी, शाळा इत्यादी.

- परिसर सेनेची स्थापना करा. परिसराच्या आकारानुसार सेना सदस्यांची संख्या ठरवावी, परंतु सदस्यसंख्या पाचपेक्षा कमी असू नये.
- परिसर स्वच्छतेच्या मूळ उद्दिष्टाशिवाय परिसर विकासाचे आणखी एखादे उद्दिष्ट निवडा. उद्दिष्ट निवडताना कायम स्वरूपी विकासावर भर द्या.
- उद्दिष्टपूर्तीसाठी उपाययोजना करा. ही उपाययोजना अमलात आणण्याजोगी व आर्थिकदृष्ट्या परवडणारी असावी.
- उपाययोजनेची कार्यवाही करा.
- कार्याचा आढावा घ्या.
- परिणामांचा अभ्यास व विश्लेषण करा.
- त्यावरून निष्कर्ष काढा.
- सविस्तर अहवाल लिहा.

**'परिसर सेने'ने हाती घेण्यासारखी काही उदाहरणे**

- **कचरा व्यवस्थापन** : कचरा निर्मितीदरम्यान कचऱ्याचे ओला व सुका यामध्ये वर्गीकरण. कचऱ्याची शाश्वत विल्हेवाट. उदा. पुनर्वापर.
- **स्वच्छता** : परिसरामध्ये थुंकणे व घाण करणे यांस मज्जाव करणे, गटारे स्वच्छ ठेवणे, शून्य कचरा मोहीम राबविणे, शासकीय यंत्रणेमार्फत परिसर स्वच्छ राखणे इत्यादी.
- **प्रदूषण नियंत्रण** : हवा, ध्वनी, जल, माती, इलेक्ट्रोमॅग्नेटिक लहरी इत्यादींच्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे.
- **वाहतूक नियंत्रण** : फेरीवाला क्षेत्र निश्चिती, वाहतुकीच्या नियमांचे पालन, वाहनांचा सामायिक वापर, एकेरी-दुहेरी मार्ग निश्चिती इत्यादी.
- वाहतूक नियंत्रण अधिकाऱ्याच्या मदतीने वाहनांचा सामायिक वापर (car pooling). उदा. रेल्वे स्टेशन/बसस्टॉप ते जवळच्या शाळा, महाविद्यालये, इस्पितळे इत्यादी.
- **परिसरातील पशु-पक्ष्यांची देखभाल** : भटक्या जनावरांना आश्रय पुरविणे, अन्नपाणी पुरविणे, वैद्यकीय मदत देणे, संरक्षण करणे, संतती नियमन करवून घेणे इत्यादी.
- **कीटक नियंत्रण** : उदा. डास, माश्या, ढेकूण, झुरळे, वाळवी इ.
- **परिसरातील जैवविविधतेचे जतन** : उदा. पक्षी, कीटक, प्राणी, वनस्पती, प्राणी-पक्ष्यांच्या अधिवासाचे जतन, अन्नपुरवठा, साप-सरडे इत्यादींच्या संरक्षणासाठी जनजागृती करणे इत्यादी.
- **वृक्ष लागवड** : उदा. वनीकरण, वृक्षसंगोपन, पडीक जमिनीवर लागवड, सामाजिक वनीकरण इत्यादी.
- **माहिती पुस्तके व माहिती कोश बनविणे** : उदा. इस्पितळे, शाळा, बँका, पोस्ट ऑफिसेस यांची माहिती. पॅन कार्ड, आधार कार्ड, वरिष्ठ नागरिक कार्ड, फ्रँकिंग इत्यादींसाठी लागणारी माहिती संकलित करणे.
- वृत्तपत्र वाचन कट्टा, वाचनालय इत्यादींची निर्मिती.
- वेगवेगळ्या वयोगटांतील लोकांसाठी मंडळे तयार करणे. उदा. बालके, माता, वयोवृद्ध, संगीतप्रेमी, क्रीडाप्रेमी, आदी.
- सार्वजनिक ठिकाणांचे आरोग्य राखणे. उदा. स्वच्छतागृह, उपाहारगृह, तरणतलाव, रस्त्यावर विकले जाणारे अन्नपदार्थ, सार्वजनिक पाणपोई इत्यादी.
- शासकीय अधिकारी व सर्वसामान्य नागरिक यांमध्ये सहसंबंध (rapport) स्थापित करणे.
- सुशोभीकरण मोहीम राबविणे.
- अपारंपरिक ऊर्जांचा वापर व प्रसार करणे. सौरशक्तीचा वापर, पावसाच्या पाण्याची साठवण, गोबरगॅसचा वापर इत्यादी.
- **शून्य कचरा निर्मितीसाठी उपाययोजना** : मतपरिवर्तन, वस्तूंचा वापर टाळणे, वापर कमी करणे, पुनर्वापर करणे, विघटन करणे इत्यादी.
- **जनजागृती मोहीम राबविणे** : उदा. मनुष्य व प्राणी यांच्यावरील प्रथमोपचार, संकटकालीन व्यवस्थापन, पर्यावरणसहिष्णू सण व उत्सव साजरे करणे इत्यादी.
- आरोग्य तपासणी व लसीकरण शिबिरांचे आयोजन करणे.
- शाळांसाठी सामायिक प्रयोगशाळा व अभ्यासगटांची निर्मिती करणे.
- परिसर विकासाच्या इतर कोणत्याही योजना व त्याची अंमलबजावणी करणे.

(संदर्भ : *http://memumbai.com, www.mcgm.gov.in)*

■